मराठी भाषिक मंडळ एडमंटन

# अनुबंध

रविवार, सप्टेंबर २०, २०१५



## या अंकात


| | |
|---|---|
| संपादकीय | 1 |
| विशेष | 2 |
| फोटो | 3 |
| माहिती आणि संपर्क | 4 |




**॥ नव्या बांधूया रेशीमगाठी,**

**जपण्या अपुली मायमराठी ॥**

आपले सर्वांचे मराठी वृत्तपत्र

(E-Newsletter)

**अनुबंध**

संपादक : ऋजुता मुधोळकर

## सांग ना रे बाप्पा

सांग ना रे बाप्पा, तू घरी कधी येणार

मोदकांच्या ताटा समोर; आपण कधी बसणार

बाप्पाच्या शेजारी, उंदीरमामा भारी

आपण नाही खाल्ले तर, पळवतील ना सारी

नैवेद्या शिवाय मोदक खाल, तर मॉम रागावते फार

लवकर खा ना रे मोदक बाप्पा, नाही तर मला कधी मिळणार

दीडच दिवस का रे बाप्पा, तू आमच्या कडे राहणार

दहा दिवस तरी थांबशील, हे मी का नाही ठरवणार ?

मॉम डॅड फारच बिझी, त्यांना जमत नाही दहा दिवस पूजा

रोज शाळेला बुट्टी मारून, मी करेन की रे तुझी सेवा

माझं कोणीच ऐकत नाही, का तर म्हणे आहे मी छोटा

बाप्पा कर ना रे मला , लवकर तू मोठा

आजी माझी स्वीट, मलाच म्हणते बाप्पा

म्हणे रोज मोदक बनवेन , करत तुझ्याशी गप्पा

डॅड म्हणतात आजीने, घेतली पाहिजे रेस्ट

कर तिला लहान अन मला मोठा, म्हणजे होईल ना रे बेस्ट !!

प्रॉमिस, मी अभ्यास करेन नक्की, आली जरी झोपेची डुलकी

तू जितके दिवस राहशील बाप्पा, धम्माल करू,

गोष्ट आपली पक्की !!! -- **ऋजुता मुधोळकर**



**- ग्लोबल बाप्पा मोरया -**

**एडमंटनचे**

**मराठी भाषिक मंडळ**

**झाले ग्लोबल !!**

लोकसत्ता प्रकाशित "लोकप्रभा"

१८ सप्टेंबर २०१५ चा

गणेशोत्सव विशेषांक जरुर वाचा.

**"देशोदेशीचा गणेशोत्सव"**

click or copy below link

http://epaper.lokprabha.com/590142/Lokprabha/25-09-2015#dual/38/1

मलेशिया, दुबई, नेदरलंड , ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझिलंड, अमेरिका आणि कॅनडा मधील विविध मराठी मंडळात साजऱ्या होणाऱ्या गणपती उत्सवा बद्दलच्या लेखांत आपले मराठी मंडळ ही झळकले !!!



## रारंग ढांग

उत्तर अमेरिकेतील लॉस एंजेलिसमधे भरवण्यात आलेल्या बृहन महाराष्ट्र मंडळाच्या २०१५ च्या अधिवेशनासाठी उत्तर अमेरिकेतून सुमारे १०० हून अधिक प्रस्ताव आले होते. कार्यकरणीने अतिशय सखोल विचार करून यातील केवळ बोटावर मोजता येतील असे कार्यक्रम निवडले होते. यात संगीत, कीर्तन, नाटके, लेखन कार्यशाला, नाट्य कार्यशाला यासारखे अनेक दर्जेदार कार्यक्रम होते. या सर्व कार्यक्रमांतून माझ्या स्मरणात राहिलेला एक कार्यक्रम म्हणजे "रारंग ढांग" या कादम्बरीचे अभिवाचन. एखादी कादंबरी अभिवाचनाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोचविणे हे अतिशय अवघड काम आहे. मुळात नाटक करताना कायिक आणि वाचिक अभिनय यातून जी अर्थनिर्मिती होते तशी मुभा अभिवचनाच्या माध्यमात नसते. नाटकातील पात्रांप्रमाणे इथे रंगमंचावर फिरता येत नाही. एकाच ठिकाणी बसून सम्पूर्ण कादंबरी वाचन करायचे तर प्रेक्षकांचे लक्ष विचलित न होउ देणे हे वाचकांचे कौशल्यच असते. 'रारंग ढांग'च्या वाचकांनी आवजातील चढ उतारांचा समर्पक वापर करत कादंबरीचे जे सादरीकरण केले त्यामुळे सुमारे दोन तास चाललेला हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. प्रत्यक्ष वाचनातील कौशल्याबरोबरच पार्श्वसंगीताचा समर्पक वापर रसपरिपोष करणारा ठरला. आणखी एक विशेष म्हणजे सैनिक वेश धारण केलेले वाचक बघताना कादम्बरीचा स्थलावकाश डोळ्यांसमोर उभा राहिला. एक अतिशय दर्जेदार कार्यक्रम उत्तर अमेरिकेतील मराठी रसिकाना दिल्याबद्दल 'रारंग ढांग'च्या सर्व टीम चे यनिमित्ताने मनःपूर्वक अभिनन्दन !! - **डॉ. मुग्धा येवलेकर**



## अश्लेषा देशपांडे

We are proud to announce that Ashlesha is a third year Science student of University of Alberta, has been awarded for her academic excellence such as

1) A 'Thirst 4 Knowledge' Undergraduate Leadership Scholarship, valued at $1000 through the Undergraduate Leadership Competition for her superior academic achievement. Recipients are selected on the basis of demonstrated leadership through involvement and participation in university or community organizations, sports activities, or cultural activities, and academic standing.

2) The Maimie S Simpson Memorial Scholarship, valued at $1750. In recognition of Maimie S Simpson who served the University and its students for so many years as the Dean of Women. The award was for the leadership abilities and potential as demonstrated by contributions to campus life and to the University of Alberta community and academic standing.

**Ashlesha** has received many scholarships in the past for her academic achievements and also for her leadership skills, her work with student groups and non-profit organizations.



ऊन, थंडी वा पावसात, नाचू लेझीम ढोल च्या तालात



गणपती बाप्पा च्या गर्जेत, दिंडी पताक्याच्या रंगात



नऊवारी साजरी, नथ नाकात झोकात



बाप्पा पुढल्या वर्षी लवकर या, घेतो तुमचा निरोप

यंदाचा गणेशोत्सव "ऑम गण गणपतये नमः" च्या मंत्रात , आथर्व शीर्ष च्या आवर्तणात , आरतीच्या टाळ्यात, लेझीम-ढोल च्या तालात, पारंपारिक वेशात आणि मराठी अमराठी आणि सर्व धर्मियांच्या उपस्थितीत अतिशय उत्साहाने आणि मोठया संख्येने वाजत गाजत पार पाडला . या सर्वाचं श्रेय मराठी मंडळाचे व्यवस्थापक आणि स्वयंसेवक यांना तसच भारतीय कल्चरल सोसायटी ला जातं. सर्वांचे मनःपूर्वक आभार .

**MBME**

**Executive Committee Members**

**President**: **Shailesh Arora**
**Secretary**: **Anagha Deshpande**
**Treasurer** : **Sanjay Deshpande**
**Member at Large**: **Amol Sagare**
**Member at Large** : **Vijay Datar**

To join MBME or to renew membership for the year 2015, fees in cash or by cheque payable to "MBME" The details of fees are as -

Family - $160.00 / Couple (or with child up to 2 years of age) - $120.00
Single - $80.00 / Student - $50.00
Members may bring their guest payable @ $15 in cash
or cheque. Non-members are welcome by paying $15 /person
Contact Email: mbmedmontonorg@gmail.com

Facebook: https://www.facebook.com/MarathiBhashikMandalEdmonton

---

We are inviting contributions from you and your family members in the form of articles, stories, poems, art, recipes, travel reports, how-to articles etc. Please encourage your children to contribute too – a special section will be included for our बाल मंडळी as well.

If you have earned any awards, publications or recognition for notable work in your area of expertise and would like to share that with the community, we would be happy to include that in the Newsletter.

Your submissions can be in Marathi or English, and should include a brief and fun bio (1 or 2 sentences) with your full name, age for children. Please send in your contributions to **mbmenewsletter@gmail.com**